मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महानगरपालिकेच्या विक्रमात लोकसहभागाचा मोलाचा वाटा!

## रील्स स्टार्सच्या रील स्पर्धेला नागरिकांचे लाखोंचे लाइक्स : तब्बल 30 लाखांच्यावर मिळाले व्ह्यूज



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने मालमत्ता करवसुलीसाठी आजपर्यंत विविध उपक्रम राबविले. नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी विभागाने होर्डिंग, पॅम्पलेट, रिक्षातून जनजागृती, सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाहन आदी आघाड्यांवर काम केले. सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणामध्ये रील्स, मीम्स, व्हिडीओ यांच्या माध्यमातून जनजागृती केली जात असून, त्याला सर्जनशीलतेची जोडसुद्धा मिळत आहे. नागरिकांमध्ये नव्या समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर पगडा निर्माण झालेला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील करदात्यांना कर भरण्याचे आवाहन करण्यासाठी विभागाने सन २०२२-२३मध्ये मीम्स स्पर्धा आयोजित केली. त्यास सोशल मीडियावर उदंड प्रतिसाद मिळाल्यानंतर, विभागाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात 'रील स्टार्स'ची 'रील स्पर्धा' आयोजित केली. त्या स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने शहरात कर भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती तसेच नागरिकांमध्ये सकारात्मकता निर्माण झाली.

### लोकसहभागातून विभागाने रचला कर संकलनाचा विक्रम

मागील आर्थिक वर्षात विभागाने तब्बल ९७७ कोटींचा कर वसूल केला. नागरिकांनी वेळेत कर भरण्यासाठी विभागाने 'एसएमएस अभियान' राबवून नागरिकांना कायम सतर्क ठेवले. त्याचप्रमाणे रील स्पर्धेतील रील्समधून करण्यात आलेल्या आवाहनाच्या माध्यमातून नागरिकांना कॉमेडी, भावनिक संदेशामधून कर भरण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. यामुळेच नागरिकांच्या सहभागातून विभागाने कर संकलनाचा विक्रम रचला. ४२ वर्षांच्या पालिका इतिहासात पालिकेने प्रथमच ९७७ कोटींचा टप्पा पार केला.

### तब्बल ३० लाख लोकांपर्यंत पोहोचले रील स्पर्धेतील व्हिडीओ

'मिशीवर मारताय ताव आणि थकबाकीदारांच्या यादीत तुमचं पहिलं नाव?', 'तुझे थकबाकीदारांच्या यादीत नाव असेल तर मी लग्न करीत नाही', 'नळाचे गेले पाणी; घरावर आणीबाणी? तुमचीच होती जबाबदारी' अशा आशयामुळे नागरिकांच्या मनात कर भरण्यासाठी असलेली अनास्था झटकून मोठ्या प्रमाणामध्ये कर भरण्यासाठी नागरिक पुढे सरसावले. स्पर्धेतील रील नागरिकांच्या पसंतीस उतरून तब्बल ३० लाख इतका प्रेक्षकवर्ग मिळाला. त्याचबरोबर स्पर्धेतील रील एक लाखाहून अधिक लोकांनी लाइक करून ३० हजारांवर नागरिकांनी ते शेअर केले.

### हे आहेत स्पर्धेतील विजेते..

» कर संकलन विभागाच्या रील स्पर्धेसाठी तब्बल पन्नासहून अधिक रील स्टार्स यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये व्यावसायिक, वकील, शाळकरी मुले, नोकरदार सर्व स्तरातील रील स्टार्स यांनी सहभाग नोंदविल्याने स्पर्धेतील आशय नागरिकांपर्यंत पोहोचून शहरात कर भरण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार झाले. त्यामधूनच आशय, व्हिडीओ निर्मिती, विषयाला अनुसरून मांडणी आदींचे निरीक्षण करून स्पर्धेचे विजेते जाहीर करण्यात आले आहेत.

प्रथम क्रमांक : प्रकाश (पीयूष) मधुकर सजगणे
द्वितीय क्रमांक : ज्योती भीमाशंकर सेतसंदी
तृतीय क्रमांक : विष्णू धर्मा घासे
चतुर्थ उत्तेजनार्थ क्रमांक : अस्लम रशीद शेख

कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी लोकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. आता लोकांना पालिकेकडे येण्याची वेळ न येता पालिका लोकांपर्यंत कशी पोचेल याचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही स्पर्धा घेण्यात आली. त्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आणि नागरिकांमध्ये कर भरण्याविषयक जागृती निर्माण झाली हे एक मोठे फलित आहे. कर संकलन विभागाच्या रील स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता ज्या ज्या विभागात समाज माध्यमांची मदत घेता येईल तिथे तिथे अशी मदत घेतली जाणार आहे. त्यातून नागरिक आणि पालिका यात संवादाचे नवनवे पुल बांधता येतील असा विश्वास आहे. नागरिकांनी रिल स्पर्धेला भरघोस प्रतिसाद दिला त्याबद्दल त्यांची पालिका अत्यंत आभारी आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा सुधारणे, यासाठी लोकांना सहभागी करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कटू कारवाई करीत असताना आम्ही काही सकारात्मक पावले उचलली आहेत. रिल स्पर्धेत नागरिकांनी वापरलेल्या अनेक अभिनव कल्पना खरोखर दाद द्याव्यात अशा आहेत. कर वसुलीच्या शेवटच्या टप्प्यात त्यातून मोठ्या प्रमाणात जनजागृती घडून आली त्यामुळे कर संकलनाचा नवीन ऐतिहासिक टप्पा गाठता आला आहे.

**- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# महापालिकेत लपवाछपवीचा कारभार

## शहरातील बेकायदा बांधकामांवरील कारवाई आणि त्याच्या अहवालाबाबत माहिती देण्यास टाळाटाळ

**पुणे | प्रतिनिधी**

एखादे प्रकरण उघडकीस आल्यावर अहवाल चौकशी समिती नेमायची, अहवाल मागवायचे आणि वेळ मारून न्यायची, असे प्रकार पुणे महापालिकेत सुरू आहेत. माजी आयुक्त विक्रम कुमार यांनी बांधकाम विभाग आणि पथ विभागाला चौकशी अहवाल आणि कार्यअहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, नवीन महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडून या अहवालावर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही.

महापालिकेत झालेल्या विविध घटनांवरील अहवालांबाबतची माहिती घेऊन त्यावर योग्य ते निर्णय घेणार असल्याचे नवे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले होते. एका महिन्यात आयुक्तांनी सर्व विभागांचा आढावा घेतला आहे. पण या चौकशी अहवालांची माहिती अद्याप घेतली नसल्याचे सांगून त्यांनी यावर अधिक बोलणे टाळले.

शहरात सध्या आठ ते दहा हजार बांधकामे सुरु आहेत. यापैकी अनेक बांधकामे बेकायदा आहेत. या बांधकामांना महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून नोटिसा दिल्या जातात. बांधकामे पाडण्याची भीती दाखवली जाते. त्यातून आर्थिक व्यवहार केले जातात, असे आरोप अनेकदा करण्यात आले. तसेच हा मुद्दा आमदार सुनील टिंगरे यांनी विधिमंडळात देखील उपस्थित केला होता. आंबेगाव बुद्रुक या भागातील सिंहगड कॉलेजलगतच्या तब्बल ११ बेकायदा इमारतींची बांधकामे महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून पाडण्यात आली. ही कारवाई करताना महापालिकेने गुप्तता पाळली होती. तसेच या बांधकामांना दोन वर्षात दोनदा नोटीस देण्यात आली होती. त्यावर आवाज उठवल्यानंतर महापालिकेने तोंडदेखलेपणाची कारवाई केल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच पुणेकरांनी बांधकाम विभागाच्या कारभारावर संताप व्यक्त केला होता. त्याची दखल घेत शहरातील बेकायदा बांधकामांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. परंतु कारवाई झाली नाही.



याचा अहवाल सादर करण्यासाठी दोन सदस्यीय समिती नेमण्याचे आदेश माजी आयुक्त विक्रम कुमार यांनी दिले होते. त्यानंतर या समितीने काम सुरु केले होते. परंतु माहिती मिळण्यास अडथळे येत आहेत, वेळ लागत आहे. अपुरे कर्मचारी संख्या असल्याने सर्वेक्षण करण्यास वेळ लागत आहे. अशी उत्तरे दिली जात होती. मात्र कुमार यांनी बांधकाम विभागाला तंबी दिल्यानंतर अहवाल सादर करण्यात आला. परंतु अहवाल कुमार यांनी प्रसिद्ध केला नाही.

### पाणीपुरवठा विभागाचे सर्वेक्षणही पाण्यात

शहरावर पाणी संकट ओढावले असल्याने पुणेकरांचे पाणी बिल्डरांकडून बांधकामासाठी वापरले तर जात नाही ना, याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पाणीपुरवठा विभागाला दिले होते. मात्र लोकसभा निवडणुकीच्या कामात कर्मचारी व्यस्त असल्याने सर्वेक्षण करण्यास कोणाला वेळ नाही, असे सांगून सर्वेक्षण करणे शक्य नसल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे निवडणुकीच्या बहाण्याने पुणेकरांचे पाणी बिल्डरांच्या घशात घातले जात आहे. पुणेकरांना पुरेसे पाणी मिळावे, यासाठी बांधकामांवर नजर ठेवून अहवाल सादर करण्याच्या आदेशाला पाणीपुरवठा विभागाने कात्रजचा घाट दाखवला आहे.

### समिती नेमलीच नाही, त्यामुळे अहवालही नाही

**» पथ विभागातील या उपअभियंत्याची सखोल चौकशी करण्यासाठी दोन अधीक्षक अभियंत्यांची समिती नेमल्याचे कुमार यांनी सांगितले होते. तसेच या समितीने अहवाल सादर केल्याची माहितीदेखील देण्यात आली होती. मात्र कुमार यांची बदली झाल्यानंतर पथ विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांने या समितीला कोणतेही लेखी आदेश देण्यात आले नव्हते. त्यामुळे समिती नेमलीच गेली नाही. त्यामुळे चौकशी झाली नाही. त्यामुळे समिती नाही अन् अहवालही नाही, असा गौप्यस्फोट केला होता. याबाबतची माहितीदेखील आयुक्त भोसले यांना देण्यात आली आहे. मात्र त्यांनी यावर अधिक बोलणे टाळले.**

# अजित पवारांनी सपत्निक घेतले 'दगडूशेठ' गणपतीचे दर्शन

## महाविकास आघाडीचे तीन उमेदवार अर्ज भरणार : उमेदवारांसाठी सभा होणार

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करणार आहेत. मात्र त्यापूर्वी आज सकाळी सुनेत्रा पवार आणि अजित पवार यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात जाऊन आरती केली. त्यावेळी आजी माजी पदाधिकारीदेखील उपस्थित होते.

गणपती बाप्पाकडे काय मागितले त्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, राज्यात लोकसभा निवडणुका होत असून त्या चांगल्या वातावरणात पार पाडाव्यात, राज्यात महायुतीचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून यावेत आणि नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत, अशी प्रार्थना गणराया चरणी केली असल्याचे त्यांनी सांगितले.

आज सुनेत्रा पवार यांचा अर्ज दाखल केला जाणार आहे. त्यातून शक्तिप्रदर्शनाचे प्रयत्न होणार असल्याची चर्चा आहे. त्या प्रश्नावर ते म्हणाले की, शक्तिप्रदर्शन वगैरे काही नाही. महायुतीच्या उमेदवाराचे अर्ज दाखल करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी उपस्थित राहत आहे. अर्ज दाखल केला जाणार आहे, त्यामुळे शक्तिप्रदर्शन वगैरे काही नाही. महायुतीमधील प्रत्येक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे एवढेच आवाहन केल्याचे त्यांनी सांगितले.

देवेंद्र फडणवीस आणि तुमच्या दोघांमध्ये काल रात्री उशिरापर्यंत बैठक सुरू होती. त्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस



आणि माझ्यात काल रात्री ९ ते १० यावेळेत बैठक झाली. त्यामध्ये काही महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा देखील झाल्याचे त्यांनी सांगितले.

### त्या विधानाचा 'ध' चा 'मा' करू नये : अजित पवार

मी तुम्हाला निधी देतो, कचा कचा बटन दाबा असे विधान तुम्ही केले आहे. त्यावरून विरोधक टीका करित आहे. त्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, परवा राहुल गांधी काय म्हणाले, त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा 'ध' चा 'मा' करू नये. मी त्या ठिकाणी गमतीने हसत हसत म्हणत होतो. त्या ठिकाणी डॉक्टर, वकील मंडळी होती. तसेच जाहीरनाम्यात अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यामुळे ती प्रलोभन झाली का ? त्यामुळे मागील उमदेवारापेक्षा अधिक चांगले काम करू आणि अधिक निधी देऊ हे सांगायचा प्रयत्न केला आहे. तसेच विकास कामांसाठी आमदार, खासदार निधी उपलब्ध करून देतात ना, अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली.

गणपती बाप्पाकडे काय मागितले या प्रश्नावर सुनेत्रा पवार म्हणाल्या की, मागील काही महिन्यांपासून बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक ठिकाणी नागरिकांची भेट घेत आहे. त्या प्रत्येक ठिकाणी नागरिक मोठ्या उत्साहात स्वागत करीत आहे. माझ्याशी संवाद साधत आहे आणि आज बारामती लोकसभा निवडणुकीचा अर्ज दाखल करीत आहे, त्यामुळे आमच्या दृष्टीने आजचा दिवस खूप मोठा आहे. आज श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले आणि आरती देखील केली. जनसामान्यांची सेवा करण्याची संधी मिळू दे आणि मोठा विजय मिळू दे, अशी प्रार्थना गणरायाकडे केली.

# पावणेचार लाखांच्या मताधिक्याने जिंकू

## लोकसभेसाठी 23 एप्रिलला उमेदवारी अर्ज दाखल करणार : संजोग वाघेरे

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षे मावळ लोकसभेचे खासदार असतानाही त्यांना मतदारसंघात एकही नवीन प्रकल्प आणला नाही. मतदारसंघातील अनेक प्रश्न जैसे थे आहेत. देशात कामगार कायदे बदलून त्यांना देशोधडीस लावले आहे. महागाई आणि बेरोजगारी वाढली आहे. यावरून प्रचारादरम्यान लोकांकडून प्रचंड चीड व्यक्त होते. मतदार माझ्या व महाविकास आघाडीच्या पाठिशी उभा राहणार असून आपला पावणेचार लाखांच्या मताधिक्याने विजयी होईल, असा विश्वास महाविकास आघाडी आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमदेवार संजोग वाघेरे पाटील यांनी बुधवारी (दि.17) पत्रकार परिषदेत व्यक्त केला.



महाविकास आघाडीतर्फे आकुर्डी येथे झालेल्या पत्रकार परिषदेस शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, महिला संघटीका अनिता तुतारे, सुशीला पवार, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, महिला शहराध्यक्ष सायली नढे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला शहराध्यक्षा ज्योती निंबाळकर, आपच्या शहराध्यक्षा मीना जावळे, पदवीधर आघाडीचे प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, माजी नगरसेवक मारूती भापकर, प्रचारप्रमुख योगेश बाबर यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, येत्या मंगळवारी (दि.23) मावळ लोकसभेच्या जागेसाठी महाविकास आघाडीतर्फे उमेदवारी अर्ज भरणार आहे. त्यावेळी युवासेनेचे प्रमुख आमदार आदित्य ठाकरे, काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे, शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील, मनोहर भोईर आणि महाविकास आघाडीचे अन्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राम मंदिर, 370 कलम हे विषय सर्वसामान्य नागरिकांसाठी महत्वाचे नाहीत. महागाई, बेरोजगारी, महिला व अल्पसंख्याकांवरील वाढते अत्याचार, शेतकरी आत्महत्या, मणिपूर येथील अमानुष अत्याचार या मुद्द्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. सर्वसाधारण नागरिकांच्या हितासाठी ही निवडणूक महत्वाची असल्याने आम्ही संजोग वाघेरे पाटील यांच्या सोबत आहोत, असे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे म्हणाले.

कामगार कायदे बदलून कामगार वर्गच संपविण्याचा प्रयत्न सुरू आहे. तळवडे येथील आगीच्या दुर्घटनेत 14 महिला कामगारांचा मृत्यू झाला. त्यांना सत्ताधारी भाजपने नुकसान भरपाई दिली नाही. पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्थायी समितीच्या भाजपच्या सभापतीला लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले. ते जेलची हवा खावून आले. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपा भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. भाजपा देश आणि संविधान विरोधी आहे. हे रोखण्यासाठी आम्ही संजोग वाघेरे पाटील यांच्या पाठीशी आहोत, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांनी सांगितले.

### मी भूमिका बदलणारा कार्यकर्ता नाही..

» विद्यमान खासदार अहंकारातून उलटसुलट वक्तव्य करीत आहेत. ही निवडणूक नातेगोत्यांची नाही. महापुरूषांच्या फोटोची मला गरज नाही. मी बीडला जन्मलेला नाही, अशी बडबड ते करीत आहेत. त्यामुळे मी त्यांना विनम्रपणे रावणाप्रमाणे अहंकार चढला असल्याची टीका केली होती. वावगे काही बोललो, असे वाघेरे म्हणाले. पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात योगदान दिले. मी आणि माझे वडिलांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेत महापौर म्हणून काम केले. माझी पत्नी गेली पंधरा वर्षे नगरसेविका आहे. त्यामुळे त्यांना माझ्याबद्दल माहिती नसेल, तर विद्यमान खासदारांचा अभ्यास कमी असल्याचा टोला त्यांनी यावेळी लगावला. लोकसभा निवडणुकीनंतर मी माझी भूमिका बदलणार नाही. योग्य भुमिकेतून लोकशाहीच्या वाचविण्याच्या विचारास ओढत मी आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मी वचन दिले आहे. मी वाघेरे पाटील कुटुंबातून आलो आहे. मी सर्वसामान्यांसोबत जोडलेला कार्यकर्ता आहे. सर्व समाजातील घटक माझे भाऊबंद आहेत, असे संजोग वाघेरे पाटील यांनी स्पष्ट केले.

# शहरात उन्हाचा चटका अन् असह्य उकाडा

## दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस, उष्णतेचा पारा चांगलाच वाढला

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस सायंकाळनंतर हजेरी लावत आहे. मात्र, शहरातील कमाल तापमान आणि उकाडा काही कमी होत नाही. बुधवारी (दि. 17) शहरात पुन्हा उच्चांकी ढमढेरे येथे 43.1 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली, तर खेड, लवळे, मगरपट्टा, वडगावशेरी, बालेवाडी, पुरंदर, राजगुरूनगर, कोरेगाव पार्क आणि हडपसर परिसरातील कमाल तापमान 41 अंशांच्या पुढे गेले आहे.

मागील एक महिन्यांपासून पुणे शहरासह जिल्ह्यातील उष्णतेचा पारा चांगलाच वाढला आहे. त्यामुळे अंगाची लाहीलाही होत असून, उकाड्याने पुणेकर हैराण झाले आहेत. सकाळी 11 वाजल्यापासून उन्हाचा चटका नकोसा करत आहे. त्यात तीन दिवसांपासून उन्हाचा पारा 43 अंशांच्या पुढे जाताच वाढत्या उकाड्यावर अवकाळी पावसाने फुंकर मारली. काही वेळ पडत असलेल्या अवकाळी पावसाने क्षणभर दिलासा मिळतो. मात्र, दिवसभर पारा पुन्हा वाढत असल्याने उकाड्याने नकोसे झाले आहे.



दरम्यान, सलग तिसऱ्या दिवशी शहरात उच्चांकी 43.1 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. याआधी वडगावशेरी, कोरेगाव पार्क, शिरूर याठिकाणी सर्वोच्च तापमानाची नोंद झाली. कमाल तापमानासह किमान तापमानातही वाढ झाली आहे. पुढील दोन दिवसांत शहरासह जिल्ह्यातील कमाल तापमानात फारसा बदल होणार नसून, दिवसभर ऊन आणि सायंकाळनंतर मेघगर्जनेसह पावसाची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे.

शहरात सोमवारी (दि.15) सायंकाळी ढगाळ वातावरण होते. मात्र, यादिवशी अवकाळीने हुलकावणी दिली. दुसऱ्यादिवशी मात्र भोसरी, नाशिकफाटा, कासारवाडी, सांगवी या भागात अवकाळीने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे या भागातील वीजपुरवठा खंडीत झाला होता. वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी नागरिकांना अनेक तास वाट पहावी लागल.

अवकाळीच्या जोरदार हजेरीने शहराच्या सखल भागात पाणी साचल्याने दुचाकीस्वारांना यातून मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागली. तर अवकाळीने भोसरी औद्योगिक परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता.त्यामुळे या भागातील उद्योजकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. या परिसरामध्ये अनेक झाडे धोकादायक स्थितीमध्ये असून या झाडांचा तारेला स्पर्श झाल्याने पुरवठा खंडित होत असल्याचा आजवरचा अनुभव आहे. भोसरी औद्योगिक वसाहतीमधील टी ब्लॉक, जे ब्लॉकसह अन्य भागातील अनेक उद्योगांना वीजपुरवठ्याचा फटका बसला आहे, अशी माहिती इंडस्ट्रीज असोसिएशन अध्यक्ष अभय भोर यांनी दिली.

### झाड पडण्याच्या 24 घटनांची नोंद

» नाशिक फाटा येथील अनेक झाडे वाहनांवर पडली. या घटनांमध्ये सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही; मात्र झाडाखाली सापडलेल्या वाहनांचे मोठे नुकसान झाले. या घटनांमुळे दोन्ही महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. पावसापासून बचाव करण्यासाठी कामगारांना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा लागला शहरात ठिकठिकाणी झाड पडण्याच्या 24 घटनांची नोंद झाली आहे. जुन्या पुणे-मुंबई महामार्गाबरोबरच पुणे-नाशिक महामार्गावरदेखील झाडे पडल्याने दोन्ही महामार्गावर वाहतुकीची कोंडी झाल्याचे चित्र पहायला मिळाले.

# शहरात गोळीबारची तिसरी घटना

## तीन दिवसांत तीन गोळीबार, कोयता हल्ल्यानंतर गोळीबाराच्या घटना वाढल्या

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात गेल्या दोन दिवसांत गोळीबाराच्या तीन घटना घडल्या आहेत. आता पुन्हा गोळीबार झाला आहे. पुणे शहरातील सिंहगड रोड परिसरात असलेल्या भुमकर चौकात आज पहाटे अडीच वाजता गोळीबार झाला आहे.

देशाची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुण्यामध्ये गुन्हेगारीच्या घटना वाढताना दिसत आहेत. कोयाता गँग सक्रीय आहे. किरकोळ कारणांवरुन कोयता हल्ले झाल्याचे अनेक घटना पुणे शहरात घडल्या आहेत. आता त्यापुढे जाऊन गोळीबाराच्या घटनाही वाढल्या आहेत. पुणे शहरात गेल्या दोन दिवसांत गोळीबाराच्या तीन घटना घडल्या आहेत. आता पुन्हा गोळीबार झाला आहे. पुणे शहरातील सिंहगड रोड परिसरात असलेल्या भुमकर चौकात आज पहाटे अडीच वाजता गोळीबार झाला आहे. कडीपेटी मागितल्याच्या कारणातून गोळीबार झाला आहे. गणेश गायकवाड यांच्यावर गोळीबार झाला आहे.



देशाची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुण्यामध्ये गुन्हेगारीच्या घटना वाढताना दिसत आहेत. कोयाता गँग सक्रीय आहे. किरकोळ कारणांवरुन कोयता हल्ले झाल्याचे अनेक घटना पुणे शहरात घडल्या आहेत. आता त्यापुढे जाऊन गोळीबाराच्या घटनाही वाढल्या आहेत. पुणे शहरात गेल्या दोन दिवसांत गोळीबाराच्या तीन घटना घडल्या आहेत. आता पुन्हा गोळीबार झाला आहे. पुणे शहरातील सिंहगड रोड परिसरात असलेल्या भुमकर चौकात आज पहाटे अडीच वाजता गोळीबार झाला आहे. कडीपेटी मागितल्याच्या कारणातून गोळीबार झाला आहे. गणेश गायकवाड यांच्यावर गोळीबार झाला आहे.

### तीन दिवसांत तीन गोळीबार

» पुणे शहरातील जंगली महाराज रोडवर दोन दिवसांपूर्वी बांधकाम व्यावसायिक धीरज दिनेशचंद्र आरगडे यांच्यावर गोळीबाराचा प्रयत्न झाला होता. स्विगीचे वस्त्र परिधान करून दुचाकीवरून आलेल्या हेल्मेट घातलेल्या दोघांनी हा प्रकार केला होता. त्या दोघे हल्लेखोरांनी दोन वेळा फायर करण्याचा प्रयत्न केला. परंतु फायर झाले नव्हते. हा प्रकार त्या ठिकाणी सीसीटीव्हीमध्ये कैद झाला होता. त्या प्रकरणाचा तपास सुरु आहे. तसेच हडपसरमध्येही दोन सैनिकांमध्ये वाद झाला. त्यातून भर रस्त्यात गोळीबार शेवाळवाडी परिसरात झाला होता. त्यात जयवंत खलाटे हे जखमी झाले होते. या प्रकरणात सुधीर रामचंद्र शेडगे यांच्यावर गुन्हा दाखल केला होता.

### दोन घटनेनंतर तिसरी गोळीबाराची घटना

पुणे परिसरात काही महिन्यांपूर्वी कोयता हल्ले वाढले होते. कोयता गँगची दहशत तयार झाली होती. किरोकोळ कारणांवरुन हल्ले झाल्याचे अनेक प्रकार घडले होते. त्यानंतर पुणे पोलिसांनी कोयता गँगविरोधात कठोर कारवाई सुरु केली. आता गोळीबाराच्या घटना वाढल्या आहेत.

जानेवारी महिन्यात गुंड शरद मोहळ याच्यावर गोळीबार झाला होता. त्यात त्याचा मृत्यू झाल्या होता. त्यानंतर इंदापूरमध्ये गुंड अविनाश बाळू धनवे (रा. आळंदी) याच्यावर हॉटेलमध्ये जेवण्यास बसलेला असताना गोळीबार झाला होता. आता गुरुवारी पहाटे गणेश गायकवड याच्यावर गोळीबार झाला. काडीपेटी मागितल्याच्या कारणातून हा गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

# महापालिका प्रशासनाचा अजब कारभार!

## महापालिकेच्या पाण्याच्या टाक्या पूर्ण होऊनही वाकडकर तहानलेलेच

**पुणे | प्रतिनिधी**

वाकड येथील प्रभाग क्रमांक 25 आणि प्रभाग क्रमांक 26 मध्ये महापालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण झाले आहे. परंतु पाणीपुरवठा करण्यासाठी विद्युतपुरवठा व विद्युत पंप बसविणे गरजेचे आहे. त्यामुळे पाच सहा वर्षे उलटूनही कोट्यवधी रुपयांची ही कामे किरकोळ कामामुळे अपूर्ण राहिल्याने येथून पाणीपुरवठा होत नाही.

परिणामी ऐन उन्हाळ्यात प्रत्येक सोसायटीला दिवसाला आठ ते दहा टँकर पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत लाखो रुपयांचा टॅक्स भरणाऱ्या वाकडकरांची तहान केव्हा भागविणार, असा सवाल येथील रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रभाग क्रमांक 26 मध्ये काळेवाडी फाट्याजवळ कावेरीनगर परिसरात सव्वाचार कोटींच्या निधीतून पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम अनेक वर्षांपासून सुरू आहे. या दोन्ही पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या बांधकाम पूर्ण करण्यासाठी महापालिकेने ठेकेदाराला किती दिवसाचा कालावधी दिला आहे किंवा ते काम किती दिवसात पूर्ण होईल? असा सवाल रणजित आबा कलाटे फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहा कलाटे यांनी महापालिका आयुक्तांना लेखी निवेदनाद्वारे केला आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वाकड येथील प्रभाग क्रमांक 25 मध्ये इंदिरा इंटरनॅशनल स्कूल जवळ तसेच प्रभाग क्रमांक 26 मध्ये देखील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम कोविडच्या अगोदरपासून सुरू आहे. ही दोन्ही बांधकामे रखडल्यामुळे



वाकड व परिसरातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. प्रभागात काही ठिकाणी कमी दाबाने तर काही ठिकाणी दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे.

टाक्यांच्या या रेंगाळलेल्या कामाबाबत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कनिष्ठ अभियंता अमरजीत म्हस्के यांना विचारणा केली असता ते म्हणाले, सन 2018/19 पासून ही कामे सुरू आहेत. परंतु संबंधित कंत्राटदाराने वेळेत काम पूर्ण केली नाहीत. त्यामुळे त्याला दंड ही ठोठावला आहे. विद्युतपुरवठा मधील काही तांत्रिक अडचणीमुळे आता टेस्टिंग करणे बाकी आहे. परंतु महिनाभराच्या आतमध्ये

### सोसायटीधारकासह स्थानिक नागरीकही त्रस्त...

» वाकड, पिंपळे निलख, विशालनगर, कावेरीनगर, कस्पटे वस्ती हा भाग झपाट्याने विकसित होत असल्या कारणामुळे महापालिकेला मोठ्या प्रमाणात कर स्वरूपात उत्पन्न मिळते. परंतु आज ऐन उन्हाळ्यात प्रत्येक सोसायटीला महिनाकाठी तीनशे ते चारशे टँकर घ्यावे लागत असल्याने सोसायटीधारकासह स्थानिक वाकडकर नागरीकही त्रस्त झाले आहेत.त्यामुळे आपण नागरिकांची पाण्याची गैरसोय लक्षात घेऊन तातडीने पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण करून नागरिकांना पाणीटंचाईतून मुक्त करावे, अशी मागणी कलाटे यांनी आयुक्त शेखर सिह यांच्याकडे केली आहे.

कावेरीनगर भागातील टाकीमधून पाणीपुरवठा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

आम्ही प्रत्येक सोसायटीत दिवसाला दहा ते बारा टँकर पाणी विकत घेतो. यावर्षी टँकर संघटनांनी दर वाढविल्याने दिवसाला 15 हजार रुपये प्रमाणे महिन्याला चार ते साडेचार लाख रुपये प्रत्येक सोसायटीला मोजावे लागतात. आशा पाच हजारांहून अधिक सोसायटी या भागात आहेत.

वाकड परिसरात लोकांना चांगले रस्ते, आरोग्यासाठी सुविधा जशा दिल्या जातात. त्याचप्रमाणे पाणी हा जीवनावश्यक घटक आहे. अनेक ठिकाणी महिला पाण्याच्या समस्यांबाबत विचारणा करत असल्याने महापालिकेने गांभीर्याने हा विषय घेऊन वाकड परिसरातील नागरिकांना दिलासा द्यावा व भीषण पाणी टंचाईतून मुक्त करावे